भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# लोक प्रतिनिधित्व (संकीर्ण उपबंध) अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक ८८)

[ १ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Representation of the People (Miscellaneous Provisions) Act, 1956

(Act No. 88 of 1956)

**[ As in force on 1st October, 1977 ]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.

१९७८

[ किंमत २० पैसे ]

# लोक प्रतिनिधित्व ( संकीर्ण उपबंध ) अधिनियम, १९५६

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव.

२. निरर्हता दूर करणे.

३. [ निरसित ].

४. [ निरसित ].

५. विवक्षित बाबतीत संसदेच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हतेस प्रतिबंध.

# लोक प्रतिनिधित्व ( संकीर्ण उपबंध ) अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक ८८)

[ २८ डिसेंबर, १९५६ ]

संसद आणि राज्य विधानमंडळ यांच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हता दूर करण्याचा आणि त्यांच्या निवडणुकांतील मतदानाविषयीचा आणि अशा निवडणुकींशी निगडीत अशा विवक्षित संकीर्ण बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. या अधिनियमाला 'लोक प्रतिनिधित्व (संकीर्ण उपबंध) अधिनियम, १९५६' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. (१) 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१' (१९५१ चा ४३) (यात यापुढे 'मुख्य अधिनियम' म्हणून निर्देशिलेला) याच्या कलम ७, खंड (ग) अन्वये आवश्यक असलेले निवडणूक-खर्चाचे प्रतिवेदन दाखल करण्यास चुकल्यामुळे त्या मुख्य अधिनियमाखाली एखाद्या व्यक्तीला संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्वाबाबत 'लोक प्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २७) याच्या प्रारंभापूर्वी प्राप्त झालेली अशी प्रत्येक निरर्हता याद्वारे दूर करण्यात येत आहे. निरर्हता दूर करणे.

(२) कोणत्याही अवैध आचरणामुळे अथवा लाचलुचपत किंवा गैरवाजवी प्रभाव यांहून अन्य अशा भ्रष्ट आचरणामुळे एखाद्या व्यक्तीला संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्वाबाबत अथवा निवडणुकीमध्ये मतदान करण्याबाबत मुख्य अधिनियमाखाली 'लोक प्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५६' याच्या प्रारंभापूर्वी प्राप्त झालेली अशी प्रत्येक निरर्हता याद्वारे दूर करण्यात येत आहे.

३. [१९५१ चा अधिनियम ४३ याच्या कलम ७ चे विशोधन]. निरसन व विशोधन अधिनियम, १९६० (१९६० चा ५८)-कलम २ आणि १ ली अनुसूची यांद्वारे निरसित.

४. [पोर्तुगीज राज्यक्षेत्रातील कैद्यांच्या बाबतीत नामनिर्देशनासाठी विशेष उपबंध]. कित्ता-कलम २ आणि १ ली अनुसूची यांद्वारे निरसित.

५. याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, मुख्य आयुक्त, मणिपूर किंवा मुख्य आयुक्त, त्रिपुरा यांच्याशी संलग्न असलेल्या सल्लागार परिषदेच्या सदस्याचे पद धारण करणारी व्यक्ती संसदेचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा तसा सदस्य म्हणून राहण्यास त्या पदामुळे निरर्ह होणार नाही. विवक्षित बाबतीत संसदेच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हतेस प्रतिबंध.

## THE REPRESENTATION OF THE PEOPLE (MISCELLANEOUS PROVISIONS) ACT, 1956

## लोक प्रतिनिधित्व ( संकीर्ण उपबंध ) अधिनियम, १९५६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| disqualification .. | .. निरर्हता | [ Long title ] |
| principal Act .. | .. मुख्य अधिनियम | [ S. 2 (1) ] |
| removal of disqualification | .. निरर्हता दूर करणे | [ Long title ] |
| return of election-expenses | .. निवडणूक-खर्चाचे प्रतिवेदन | [ S. 2 (1) ] |

---

## लोक प्रतिनिधित्व ( संकीर्ण उपबंध ) अधिनियम, १९५६

## THE REPRESENTATION OF THE PEOPLE (MISCELLANEOUS PROVISIONS) ACT, 1956

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| निरर्हता | .. disqualification | .. [ Long title ] |
| निरर्हता दूर करणे | .. removal of disqualification | .. [ Long title ] |
| निवडणूक-खर्चाचे प्रतिवेदन | .. return of election-expenses | .. [ S. 2 (1) ] |
| मुख्य अधिनियम | .. principal Act | .. [ S. 2 (1) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई